पोस्टेज आगाऊ न भरण्याचा क्रमांक AR/AGD/WP-09/2009-11, Postal Regd. No. RNP/AGD/193/(A)2009-11.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

क्र. ५] गुरुवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०११ : माघ १४, शके १९३२ [किंमत : २५:०० रूपये]

स्वतंत्र संकलन म्हणून फ़ाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-औरंगाबाद विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | — ते — |
| संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले. | २२१ ते २६४ |
| भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ औरंगाबाद विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | — ते — |


## संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र (मर्यादित)

औरंगाबाद झालर क्षेत्राचा प्रारुप विकास आराखडा प्रकाशित करणे

नोटीस

कमांक सिडको/मु.प्र.(न.श.)/औ.बाद(औ.झा.क्षे.)/2011/10 :– ज्या अर्थी महाराष्ट्र राज्य शासनाने अधिसूचना कमांक टीपीएस. 3006/381/सीआर – 246/2006/युडी–30, दिनांक 3 ऑक्टोबर, 2006 नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 40, पोट–कलम (1), उप–कलम (ब) (महा. 37–1966) (यापुढे "उक्त कायदा" असे संबोधिलेले) व त्या अन्वये दिलेल्या अधिकारानुसार "औरंगाबाद झालर क्षेत्राकरिता" (यापुढे उक्त अधिसूचित क्षेत्राकरीता असे संबोधलेले) शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (यापुढे "उक्त महामंडळ" असे संबोधिलेले) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

आणि ज्या अर्थी शासनाने उक्त अधिसूचित क्षेत्रासंदर्भात दिनांक 8 जुलै 2008 रोजी दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक त्या ठिकाणी कमीतकमी गरजेपुरते व मूलभूत सेवा सुविधांसाठी भू–संपादन करावयाचे आहे आणि सदरील आराखडा यशस्वीरीत्या राबविण्यासाठी व अविकसित जागांचा विकास साधण्यासाठी विविध माध्यमांचा अवलंब करण्याचे आदेश दिले आहेत.

आणि ज्या अर्थी उक्त महामंडळास उक्त कायद्याच्या कलम 115 नुसार नियोजन प्रस्ताव तयार करण्याऐवजी उक्त कायद्याच्या कलम 26 नुसार औरंगाबाद झालर क्षेत्रातील जमीनीसाठी विकास आराखडा तयार करणे इष्ट वाटले.

आणि ज्या अर्थी उक्त महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक 03 ऑक्टोबर, 2008 रोजी झालेल्या ठराव क्र. 9944 नुसार विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त कायद्याच्या कलम 23 नुसार विकास आराखडा तयार करण्याचा इरादा 13 नोव्हेंबर, 2008 रोजी जाहीर केला आहे.

आणि ज्या अर्थी महामंडळाने अधिसूचित क्षेत्राच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन उक्त कायद्याच्या कलम 25 नुसार विद्यमान भूवापर नकाशा तयार करुन दिनांक 08 जुलै, 2009 रोजी शासनास सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी उक्त कायद्याच्या कलम 26 नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महामंडळाने अहवाल व विकास नियंत्रण नियमावलीसह प्रारुप विकास आराखडा तयार केला असून सिडको संचालक मंडळाने दिनांक 30 नोव्हेंबर, 2010 च्या बैठकीतील ठराव क. 10445 नुसार सदर प्रारुप विकास आराखडा, अहवाल, विकास नियंत्रण नियमावलीसह उक्त कायद्यात नमूद केलेल्या प्रावधानानुसार प्रसिध्द करण्यात मान्यता दिली आहे.

आणि म्हणून ठराव क. 10445 दिनांक 30 नोव्हेंबर, 2010 व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या आधारे व उक्त कायद्याच्या कलम 26 च्या उपकलम (1) मध्ये नमूद केलेल्या प्रावधानानुसार उक्त महामंडळाने प्रारुप विकास आराखडा, अहवाल व विकास नियंत्रण नियमावली तयार केली आहे व ती प्रसिध्दीत देत असून लोकांकडून सूचना व हरकती मागवत आहे.

औरंगाबाद झालर क्षेत्राकरीता तयार केलेला प्रारुप विकास आराखडा, अहवाल व विकास नियंत्रण नियमावली नगररचना अधिकारी, सिडको कार्यालय, उद्योग भवन, नवीन औरंगाबाद तसेच खाली नमूद केलेल्या कार्यालयात सर्व कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत लोकांचे अवलोकनार्थ व तपासणी करीता उपलब्ध राहील.

अ. व्यवस्थापकीय संचालक, सिडको मर्यादित, यांचे कार्यालय, निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई.

ब. अतिरिक्त मुख्य नियोजनकार (न.श. व वि.प्र.), 4 था मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

क. मुख्य प्रशासक (न.श.), सिडको मर्यादित, यांचे कार्यालय, उद्योक भवन, औरंगाबाद.

ड. जिल्हाधिकारी औरंगाबाद, यांचे कार्यालय, औरंगाबाद.

ई. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.

फ. तहसिलदार, ता. औरंगाबाद यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

जी. उप संचालक, नगररचना यांचे कार्यालय, नगररचना विभाग, प्रिंट ट्रॅव्हल्स चौक,सी.बी.एस. रोड, औरंगाबाद.

एच. सहा. संचालक नगररचना यांचे कार्यालय, नगररचना विभाग, ज्युबिलीपार्क, औरंगाबाद.

आय. औरंगाबाद झालर क्षेत्राअंतर्गत 28 गावांतील ग्रामपंचायत कार्यालय, औरंगाबाद.

औरंगाबाद झालर क्षेत्रातील तयार केलेला प्रारुप विकास आराखडा, अहवाल व विकास नियंत्रण नियमावली याची साक्षंकित प्रत किंवा त्यातील ठराविक भाग नगररचना अधिकारी यांचे कार्यालय, सिडको, उद्योक भवन, नवीन औरंगाबाद येथे विकीसाठी उपलब्ध राहतील. औरंगाबाद झालर क्षेत्रातील तयार केलेला प्रारुप विकास आराखडा, अहवाल व विकास नियंत्रण नियमावली सिडकोच्या डब्ल्यू.डब्ल्यू.डब्ल्यू. सिडकोइंडिया.कॉम या संकेत स्थळावर सुध्दा उपलब्ध राहतील.

औरंगाबाद झालर क्षेत्राकरीता तयार केलेला प्रारुप विकास आराखडा, अहवाल व विकास नियंत्रण नियमावली या संदर्भात काही सूचना किंवा हरकती असल्यास नगररचना अधिकारी, औरंगाबाद झालर क्षेत्र यांचे कार्यालय, सिडको कार्यालय, उद्योक भवन, नवीन औरंगाबाद 431 003 यांच्याकडे ही अधिसूचना महाराष्ट्र शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांच्या आत सादर करण्यात याव्यात.

शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र (मर्यादित)

संचालक मंडळाच्या आदेशानुसार व नावाने

स्थळ :– औरंगाबाद.
दिनांक :– 01 फेब्रुवारी, 2011.

स्वाक्षरित/–
( पी. आर. कुलकर्णी )
मुख्य प्रशासक (न.श.)
सिडको, नवीन औरंगाबाद.

**CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**

**Publication of Draft Development Plan of the Aurangabad Fringe Area**

**NOTICE**

**No. CIDCO/CA(NT)/AUR(AFA)/2011/10 :- Whereas the Government of Maharashtra has, by Government Notification No. TPS-3006/381/CR-246 /2006/UD-30 dated 3rd October, 2006, promulgated in exercise of the powers conferred by Clause (b) of Sub-Section (1) of Section-40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and all other powers enabling it in this behalf, appointed the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (hereinafter referred to as "the Corporation") to be the Special Planning Authority (SPA) for "Aurangabad Fringe Area" (hereinafter referred to as the "said Notified Area").**

**AND WHEREAS, the Government, vide letter dated 8th July, 2008 directed CIDCO as S.P.A. of the said Notified Area to go for bare minimum acquisition of lands for infrastructure development and employ various means for development of undeveloped land for successfully implementing the Plan.**

**AND WHEREAS, the Corporation found it expedient to prepare Development Plan under Section-26 of the said Act for the area comprised in the Aurangabad Fringe Area instead of preparing Planing Proposals under Section-115 of the said Act.**